

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

आजचा सुविचार

विचार सकारात्मक असतील तर प्रत्येक संकटातून मार्ग सापडतो.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार दि. 24 नोव्हेंबर - 2026 ❀ वर्ष ;1 ❀ अंक ; 189 ❀ पाने .4 ❀ किमंत 4 रू ❀ email:hinduprakashvarta@gmail.com / Postal Regn ,No, ABD/551/2026/2028

थोडक्यात वार्ता

धारावी, वांद्रे पूर्वसह अनेक भागांवर परिणाम

मुंबई : प्रतिनिधी

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. बृहन्मुंबई महानगरपालिकेने (BMC) मुख्य जलवाहिनीतील गळती दुरुस्त करण्यासाठी 24 तासांची पाणीकपात जाहीर केली आहे. गुरुवार, 26 नोव्हेंबर 2026 रोजी सकाळी 9 वाजल्यापासून शुक्रवार, 27 नोव्हेंबर रोजी सकाळी 9 वाजेपर्यंत ही कपात लागू राहणार आहे. शहरातील विविध प्रशासकीय विभागांमधील पाणीपुरवठ्यावर याचा परिणाम होणार आहे. मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीचे कामबीएमसीच्या माहितीनुसार, पवई उच्चस्तरीय जलाशय क्रमांक 1 ते सहार गावादरम्यानच्या मुख्य पाणीपुरवठा वाहिनीतील गळती दुरुस्त करण्यात येणार आहे. या कामासाठी काही भागांतील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद ठेवण्यात येईल, तर काही परिसरांत कमी दाबाने पाणीपुरवठा केला जाणार आहे.धारावी, मरोळ आणि वांद्रे पूर्वमध्ये परिणामया पाणीकपातीचा धारावी, मरोळ, चकाला, जे. बी. नगर, वांद्रे पूर्व, विक्रोळी, कांजूरमार्ग आणि भांडुपच्या काही भागांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. बीएमसीच्या माहितीनुसार, काही प्रशासकीय विभागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असून, इतर काही भागांत कमी दाबाने पाणी मिळेल.

कलारीप्पायट्टूच्या राज्यस्तरीय स्पर्धेत ढोरेगावच्या खेळाडूंची चमक

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड, जिल्ह्यातील खेळाडूंचीही पदकांची लयलूट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पारंपरिक भारतीय युद्धकला असलेल्या कलारीप्पायट्टूच्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, ढोरेगावच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. शाळेच्या सुमेरा शब्बीर शेख आणि प्रतीक्षा राहुल आल्हाट या दोन विद्यार्थिनींनी सुवर्णपदक पटकावत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. विशेष म्हणजे, ढोरेगाव शाळेच्या सात खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत विविध पदकांची कमाई केली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळवलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा गुणवत्तेचा गौरव झाला आहे.सातारा येथे २२ नोव्हेंबर २०२६ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मराठी कलारीप्पायट्टू असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या गटात स्पर्धा पार पडली.या स्पर्धेसाठी ढोरेगाव शाळेतील सुमेरा शब्बीर शेख, प्रतीक्षा राहुल आल्हाट, माहीम युनूस पठाण, मारिया अनिस शेख, रोशनी रवी आढागळे, आदित्य किशोर उमाप आणि फरहान नयुम शेख या सात खेळाडूंनी पात्रता मिळवली होती. चूवडूकल, मयपटू या वैयक्तिक प्रकारांसह नेदिवाडीपयटू या सांघिक प्रकारात खेळाडूंनी कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. जिल्ह्यातील खेळाडूंची पदकांची कमाईराज्यस्तरीय



स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध वयोगटांत पदके मिळवली. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात सुमेरा शब्बीर शेख आणि प्रतीक्षा राहुल आल्हाट यांनी सुवर्णपदक, स्वरा चंद्रकांत थोरात हिने रौप्यपदक, तर मुस्कान फजल शहा हिने कांस्यपदक पटकावले. मुलांच्या गटात आदित्य सुनील विरासे आणि अविष्कार विठ्ठल विरासे यांनी रौप्य, तर सोहम सुनील पारिपल्ली आणि उत्कर्ष गोविंद वाघमारे यांनी कांस्यपदक मिळवले.१९ वर्षांखालील मुलींच्या गटात माहीम युनूस पठाण आणि मारिया अनिस शेख यांनी रौप्य, तर रोशनी रवी आढागळे हिने कांस्यपदक पटकावले. याच वयोगटातील मुलांच्या गटात अंश युवराज झाल्टे याने सुवर्ण, रुपेश राहुल जायवाळ याने रौप्य, तर आदित्य किशोर उमाप आणि फरहान नसीर शेख यांनी कांस्यपदक मिळवले.खेळाडूंना प्रशिक्षक अली बाकोदा, सुमीत खरात, बंटी राठोड, शेख मुदस्सीर आणि उदय तगरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशासाठी राजेश हिवाळे, मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, मुग्धा निमसे, नीलिमा कुलकर्णी, परमेश्वर मस्के, अली बाकोदा, शामीर शेख, सचिन पाटसकर आणि कल्याणी जगताप यांनी विशेष पुढाकार घेतला.खेळाडूंच्या यशाबद्दल सरपंच रजियाबी अयुब पटेल, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलिल पटेल, उपाध्यक्ष अशोक कांबळे, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव, केंद्रप्रमुख सचिन डमाळे, केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुऱ्हे, जिल्हा क्रीडाधिकारी मुकुंद वाडगावकर, क्रीडाधिकारी खंडू यादवराव, रामा मायंदे, गणेश मालोदे, रेखा परदेशी, मराठी कलारीप्पायट्टू महाराष्ट्र असोसिएशनचे अध्यक्ष धुमाळे, सचिव बी. एस. राठोड, छत्रपती संभाजीनगर असोसिएशनच्या अध्यक्ष राजलक्ष्मी भाजीभाकरे, सचिव राहुल जैन आणि कोषाध्यक्ष पंकज राठोड यांच्यासह पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सुमेरा शेख आणि प्रतीक्षा आल्हाट यांच्याकडून आता राष्ट्रीय स्तरावरही पदकांची अपेक्षा व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली क्रीडा गुणवत्ता आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करू शकतात, हे ढोरेगावच्यांआहे.

मनसुख हिरेन हत्या प्रकरणात परमबीर सिंग यांच्यावर कारवाईची मागणी

उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली गाडी सापडल्या प्रकरणी आणि उद्योगपती मनसुख हिरेन यांच्या हत्येच्या बहुचर्चित प्रकरणात न्यायालयात आज महत्वाची सुनावणी होणार आहे. मनसुख हिरेन हत्या प्रकरणात परमबीर सिंग यांना आरोपी म्हणून नामनिर्देशित करण्याची आणि खोटे प्रतिज्ञापत्र सादर केल्याप्रकरणी त्यांना ताब्यात घेण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात आज एनआयए (NIA) न्यायालयात महत्त्वाची सुनावणी होणार आहेही सुनावणी आज दुपारी 3:00 वाजता कोर्टरूम क्रमांक 23 मध्ये होणार आहे. मागील सुनावणीदरम्यान, अटक वॉरंट जारी होण्याची शक्यता लक्षात घेऊन परमबीर सिंग स्वतः न्यायालयात हजर राहिले होते; आजही ते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील इतर आरोपी आणि माजी पोलीस अधिकारी सचिन वाझे देखील आजच्या या महत्त्वपूर्ण सुनावणीसाठी न्यायालयात उपस्थित राहणार आहेत.'जैश-उल-हिंद'च्या टेलिग्राम पोस्टशी संबंधित अहवाल तयार करण्यासाठी सायबर तज्ज्ञ इशान सिन्हा यांना 5 लाख रुपयांच्या मानधनाबाबतच्या प्रकरणात, मुंबई उच्च न्यायालयाने प्रदीप शर्मा यांचा जामीन अर्ज फेटाळतानाच एनआयएच्या (NIA) तपासावर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.मुंबई, 23 नोव्हेंबर 2026 अँटिलिया स्फोटक प्रकरण आणि व्यावसायिक मनसुख हिरेन यांची हत्या या प्रकरणांच्या संदर्भात, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई सुरू करण्याच्या मागणीवर आज एनआयए (NIA) विशेष न्यायालयात महत्त्वाची सुनावणी होणार आहे. निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) भीमराज घाडगे यांनी दाखल केलेल्या अर्जावर ही सुनावणी होणार असून, ती आज दुपारी 3:00 वाजता कोर्टरूम क्र. 23 मध्ये पार पडेल. मागील सुनावणीदरम्यान, अटक वॉरंट जारी होण्याच्या भीतीने परमबीर सिंग स्वतः हजर झाले होते. ते आजदेखील न्यायालयात हजर राहण्याची शक्यता आहे.या दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर सुनावणी1. न्यायालयात खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याच्या आरोपावरून परमबीर सिंग यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची आणि त्यांना ताब्यात घेण्याची मागणी.2. मनसुख हिरेन हत्याकांडातील उपलब्ध पुराव्यांच्या आधारे परमबीर सिंग यांच्यावर आरोप निश्चित करून खटला चालवण्याची मागणी.यासंदर्भात एसीपी भीमराज घाडगे यांनी आपल्या अर्जात तीन महत्त्वाचे पुरावे सादर केले असून परमबीर सिंग यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.जैश-उल-हिंदच्या टेलिग्राम पोस्टशी संबंधित अहवाल आणि इशान सिन्हा यांना दिलेले 5 लाख रुपये. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाच्या कागदपत्रांपैकी एक म्हणजे सायबर



सुरक्षा तज्ञ इशान सिन्हा यांचा जबाब, जो एनआयएने (NIA) आपल्या तपासादरम्यान नोंदवला होता आणि तो त्यांच्या आरोपपत्राचा एक भाग आहे.25 फेब्रुवारी 2021 रोजी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' या निवासस्थानाबाहेर स्फोटकांनी भरलेली एक स्कॉर्पिओ कार सापडल्यानंतर, 27 फेब्रुवारी रोजी जैश-उल-हिंदच्या नावाने एका टेलिग्राम चॅनलवर या घटनेची जबाबदारी स्वीकारणारी एक पोस्ट दिसली. त्यानंतर ईशान सिन्हाच्या जबाबानुसार, 9 मार्च 2021 रोजी परमबीर सिंग यांनी त्याला या टेलिग्राम चॅनलबाबत एक लेखी अहवाल सादर करण्यास सांगितले.सिन्हाने सुरुवातीला गोपनीय कामाचे कारण देत लेखी अहवाल सादर करण्यास आक्षेप घेतला. तरीदेखील परमबीर सिंग यांच्या आग्रहामुळे त्याने आपल्या कार्यालयात लॅपटॉपवर तो अहवाल तयार केला. त्यानंतर परमबीर सिंग यांनी त्याला अहवालात जैश-उल-हिंदच्या नावाने समोर आलेल्या पोस्टरचा समावेश करण्यास सांगितले. सिन्हाने अहवालात सुधारणा करून तो परमबीर सिंग यांच्या अधिकृत ईमेल पत्त्यावर पाठवला.सिन्हाच्या जबाबात असेही म्हटले आहे की, त्याने तांत्रिकदृष्ट्या शोधून काढलेले टेलिग्राम चॅनतयार झाल्यानंतर 5 लाख रुपयांचे पेमेंट; उच्च न्यायालयाने विचारले होते, यात परमबीर सिंग यांचा काय स्वार्थ होता? तसेच एनआयए (NIA) समोर नोंदवलेल्या ईशान सिन्हाच्या जबाबानुसार, परमबीर सिंग यांनी अहवाल तयार झाल्यानंतर त्याला पैसे देऊ केले. सिन्हाने पैसे मिळण्याची कोणतीही अपेक्षा व्यक्त केली नव्हती. असे असूनही, परमबीर सिंग यांनी प्रथम त्यांच्या वैयक्तिक सहाय्यकाला 3 लाख रुपये देण्याचे निर्देश दिले आणि नंतर ही रक्कम 5 लाख रुपयांपर्यंत वाढवली. सिन्हाच्या जबाबानुसार, परमबीर सिंग यांच्या वैयक्तिक सहाय्यकाने त्याला 5 लाख रुपये रोख देण्यात आले होते. ही संपूर्ण घटना एनआयएच्या तपास सामग्रीमध्ये नोंदवलेली आहे.प्रदीप शर्मा यांचा जामीन अर्ज फेटाळला23 जानेवारी 2023 रोजी, न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती आर. एन. लढा खंडपीठाने माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांचा जामीन अर्ज फेटाळताना, एनआयएच्या तपासातील अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आणल्या होत्या. न्यायालयाने आपल्या आदेशात ईशान सिन्हा यांच्या जबाबाचा विस्तृतपणे उल्लेख केला होता. विशेष म्हणजे, परमबीर सिंग यांच्या सूचनेनुसार ईशान सिन्हा यांना मुंबई पोलिसांच्या गुप्त सेवा निधीतून 5 लाख रुपये देण्यात आल्याचे समोर आले होते.एका सायबर तज्ञाला एवढी मोठी रक्कम का देण्यात आली आणि तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांचा या प्रकरणात काय स्वार्थ होता, असा प्रश्न उच्च न्यायालयाने उपस्थित केला होता. या पैलूचा तपास करण्यात एनआयएच्या अपयशावरही न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. तसेच अँटिलियाबाहेर स्फोटकांनी भरलेले वाहन ठेवण्याच्या कटात इतर व्यक्तींच्या भूमिकेची पुरेशी चौकशी न झाल्याबद्दल उच्च न्यायालयाने असमाधान व्यक्त केले.पत्तचर निधीतून 5 लाख रुपयांचे प्रकरणएसीपी भीमराज घाडगे यांनी आपल्या अर्जात एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे की, पोलिसांचा गुप्तचर निधी हा गोपनीय पोलीस काम, खबऱ्यांसाठी आणि गुन्हेगारी संबंधित गुप्त माहिती गोळा करण्यासाठी आहे. त्यांचा आरोप आहे की, या निधीतून 5 लाख रुपये देऊन परमबीर सिंग यांनी सार्वजनिक निधीचा गुन्हेगारी गैरवापर केला आहे. या आधारावर, त्यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम 409 अंतर्गत कारवाईची मागणी केली आहे. या कलमांतर्गत सार्वजनिक सेवकाने केलेल्या गुन्हेगारी विश्वासघातासाठी जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे.घाडगे यांनी एनआयएच्या तपास सामग्रीमध्ये आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशात पेमेंट आणि त्याच्या स्रोताचा उल्लेख असूनही, परमबीर सिंग यांची गुन्हेगारी जबाबदारी सिद्ध झालेली नाही, असेही सांगितले.सचिन वाझे यांचा न्यायालयबाह्य कबुलीजबाबघाडगे यांच्या अर्जालेला न्यायालयबाझे यांनी त्यांना मनसुख हिरेन यांच्या आहे की, वाझे यांनी त्यांना सांगितयांचा खून आणि ण्याचे कृत्य परमबीर सिंग यांच्या सूचनेनुसार करण्यात आले होते. वाझे कळवली होती.



गंगापूर तालुक्यात दुष्काळाच्या झळा तीव्र; ४० गावांना ६० टँकरद्वारे पाणी



गंगापूर :प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्र होत असून ४० गावांत ६० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असल्याचे वृत्त आहे. अनेक गावांतील विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी खालावली आहे. जायकवाडी धरण जवळ असूनही तांत्रिक अडचणी आणि अपुऱ्या जलसाठ्यामुळे काही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने सुरू नाहीत. टंचाई निवारणासाठी प्रशासनाने काही विहिरी अधिग्रहित केल्या असून आणखी गावांतील मागण्यांची पाहणी सुरू आहे. पावसातील खंडामुळे खरीप पिकांचे नुकसान झाले असून रब्बी पेरण्यांवरही परिणाम होण्याची भीती आहे. चाऱ्याची कमतरता आणि मजुरांचे स्थलांतर हेही प्रश्न गंत.

आजचे राशी भविष्य मंगळवार, दि. 24 नोव्हेंबर 2026

॥ 12 राशींचे आजचे भविष्य ॥

1.	मेष	आजचा दिवस तुमच्यासाठी उत्साहवर्धक राहील. कामात यश मिळेल व मन प्रसन राहील.
2.	वृषभ	आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुटुंबात आनंदांचे वातावरण राहील.
3.	मिथुन	नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे. संवादातून कामे मार्गी लागतील.
4.	कर्क	आरोग्याची काळजी घ्या. खर्चावर नियंत्रण ठेवा, प्रवास टाळा.
5.	सिंह	मान-सन्मानात वाढ होईल. वरिष्ठांची कृपा लाभेल. धाडसी निर्णय फायदेशीर ठरेल.
6.	कन्या	शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात प्रगती होईल. घरगुती कामे सुरळीत होतील.
7.	तुला	आर्थिक लाभाची संधी मिळेल. नातेसंबंध दृढ होतील.
8.	वृश्चिक	मनातल्या चिंता दूर होतील, गुंतवणुकीत सावधगिरी बाळगा.
9.	धनु	विद्यार्थ्यांसाठी दिवस उत्तम आहे. प्रवासातून लाभ होईल.
10.	मकर	कामाच्या ठिकाणी कौतुक होईल. आर्थिक प्रगतीसाठी हा काळ अनुकूल आहे.
11.	कुंभ	नवीन प्रकल्प हाती घेण्यास योग्य वेळ आहे. मित्रांचा सहवास लाभदायक ठरेल.
12.	मीन	भावनिक निर्णय टाळा. तब्येत सांभाळा. आध्यात्मिक क्रियेत मन गुंतवा.

शुभ दिवस... शुभ भविष्य...

संपादकिय


बदलत्या काळातील महागाई : सामान्य माणसाच्या जगण्याचा संघर्ष!

महागाईच्या वाढत्या वणव्यात सर्वसामान्यांचे संसार होरपळत आहेत; उत्पन्न मर्यादित आणि खर्च अमर्यादित अशी आज प्रत्येक कुटुंबाची अवस्था झाली आहे. आजचा काळ बदलाचा आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, शेती आणि दळणवळण अशा प्रत्येक क्षेत्रात मोठी प्रगती होत आहे. माणसाचे जीवन अधिक आधुनिक आणि सुखकर होत असल्याचे चित्र दिसत असले, तरी या बदलत्या काळात सर्वसामान्य माणसासमोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे, ते म्हणजे महागाई! पूर्वी ज्या पैशात महिन्याचा संसार सहज चालायचा, त्याच पैशात आज आठवड्याचा खर्च भागवणेही कठीण झाले आहे. त्यामुळे आज प्रत्येक घरात एकच प्रश्न ऐकायला मिळतो, पगार वाढतोय का? नाही! मग खर्च कसा भागवायचा? महागाई ही केवळ बाजारातील वस्तूंच्या किमती वाढण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती आज सामान्य माणसाच्या स्वप्नांवर, मुलांच्या शिक्षणावर, कुटुंबाच्या आरोग्यावर आणि भविष्यातील नियोजनावर परिणाम करत आहे. भाजीपाला, धान्य, दूध, खाद्यतेल, गॅस सिलिंडर, पेट्रोल, डिझेल, औषधे, वीजबिल, घरभाडे अशा प्रत्येक गोष्टीचा खर्च वाढत चालला आहे. रोजच्या जीवनासाठी आवश्यक असलेल्या वस्तू खरेदी करतानाही नागरिकांना दहा वेळा विचार करावा लागत आहे. वाढते उत्पन्न आणि वाढता खर्च यांचा ताळमेळ कुठे? आज अनेक कुटुंबांमध्ये कमावणारे हात मोजके आणि खर्चाच्या जबाबदाऱ्या मोठ्या आहेत. घर चालवणे, मुलांचे शिक्षण, आई-वडिलांची औषधे, घराचे हप्ते, वीजबिल, प्रवास आणि इतर गरजा भागवताना मध्यमवर्गीय कुटुंबांची दमछाक होत आहे. महिन्याच्या सुरुवातीला मिळणारा पगार महिन्याच्या अखेरीपर्यंत टिकवणे हेच मोठे आव्हान बनले आहे. विशेषतः रोजंदारीवर काम करणारे मजूर, शेतमजूर, छोटे व्यावसायिक, हातगाडीधारक, शेतकरी आणि अल्प उत्पन्न गटातील नागरिक यांच्यावर महागाईचा सर्वाधिक परिणाम होत आहे. रोज कमवा आणि रोज खा, अशी परिस्थिती असणाऱ्या कुटुंबांना वस्तूंच्या वाढत्या किमतींचा मोठा फटका बसतो. उत्पन्न वाढण्याचा वेग कमी आणि खर्च वाढण्याचा वेग अधिक असल्यामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. शेतकरीही महागाईच्या चाट्यात! महागाईचा प्रश्न उपस्थित झाला की अनेकदा ग्राहकांच्या अडचणींची चर्चा होते; परंतु शेतकऱ्यांची परिस्थितीही तितकीच गंभीर आहे. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, औषधे, डिझेल, मजुरी आणि सिंचनाचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्गाची अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडते. शेतकरी मोठ्या कष्टाने पीक घेतो; मात्र बाजारात त्याला योग्य भाव मिळेलच याची खात्री नसते. ग्राहकाला बाजारात महाग वस्तू मिळते आणि शेतकऱ्याला त्याच वस्तूचा योग्य मोबदला मिळत नाही, ही विसंगती दूर होणे आवश्यक आहे. उत्पादक आणि ग्राहक या दोघांच्याही हिताचा विचार करणारी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. शिक्षण आणि आरोग्यही झाले महाग! एकेकाळी शिक्षण हे प्रत्येकाच्या प्रगतीचे साधन मानले जात होते. आज मात्र शिक्षणाचा खर्च अनेक पालकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. शाळेची फी, पुस्तके, वह्या, गणवेश, प्रवास आणि खासगी शिकवणी यासाठी मोठी रक्कम खर्च करावी लागते. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील पालकांना मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी आर्थिक संघर्षबाबदारी आहे असे म्हणणे पुरेसे नाही; त्यासाठी शासन, प्रशासन, व्यापारी वर्ग आणि ग्राहक या सर्वांची भूमिका महत्त्वाची आहे. बाजारपेठेतील अनावश्यक साठेबाजी, कृत्रिम टंचाई, काळाबाजार आणि अवाजवी नफेखोरी यांना आळा बसला पाहिजे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे. शासनाने गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना दिलासा देणाऱ्या योजना अधिक प्रभावीपणे राबवाव्यात. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळावा, रोजगाराच्या संधी वाढाव्यात आणि सामान्य प्रत्येक कुटुंबाला दोन वेळचे अन्न, मुलांना चांगले शिक्षण आणि आजारी व्यक्तीला परवडणारे उपचार मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. महागाईमुळे सामान्य माणसाची बचत संपत आहे, स्वप्ने लहान होत आहेत आणि भविष्याची चिंता वाढत आहे. त्यामुळे महागाईकडे केवळ आर्थिक आकडेवारी म्हणून न पाहता सामाजिक प्रश्न म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, देशाची खरी प्रगती ही केवळ आर्थिक विकासाच्या आकड्यांवर मोजता येत नाही. ती सामान्य माणसाच्या चेहऱ्यावरील समाधान, त्याच्या घरातील आनंद आणि त्याच्या कुटुंबाच्या सुरक्षित भविष्यावरून ठरते. महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या सामान्य माणसाला दिलासा मिळाला, तरच विकासाचा खरा अर्थ साध्य होईल. कारण महागाईच्या काळात सामान्य माणसाला मोठमोठी स्वप्ने नकोत; त्याला फक्त कष्टाच्या पैशात सन्मानाने जगता यावे, एवढीच अपेक्षा आहे!

आजच्या ५ आकर्षक आणि ज्ञानवर्धक गोष्टी


वाचा... शिका... वाढा...

1 ऑक्टोपसला तीन हृदये असतात!




ऑक्टोपस या समुद्री जीवाला तीन हृदये असतात.

2 सूर्यप्रकाश पृथ्वीवर यायला किती वेळ लागतो?




सूर्यापासून निघालेला प्रकाश पृथ्वीवर पोहोचण्यासाठी साधारण ८ मिनिटे २० सेकंद इतका वेळ लागतो.

3 मानवी शरीरात किती हाडे असतात?




प्रौढ माणसाच्या शरीरात साधारण २०६ हाडे असतात.

4 बर्फ पाण्यावर का तरंगतो?



बर्फांची घनता द्रवरूप पाण्यापेक्षा कमी असल्यामुळे तो पाण्यावर तरंगतो.

5 विजेची चमक किती गरम असते?



विजेच्या चमकेतील हवा काही क्षणांसाठी सूर्याच्या पृष्ठभागापेक्षाही अधिक गरम होऊ शकते.

वाचत राहा, शिकत राहा आणि ज्ञान वाढवत राहा!

गर्भसंस्कार ही काळाची गरज! संस्कारांची सुरुवात जन्मानंतर नव्हे, तर गर्भावस्थेपासून.



आजच्या काळात आपण मुलांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या करिअरसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी खूप मेहनत घेतो. चांगली शाळा, चांगले शिक्षण, चांगले वातावरण मिळावे, यासाठी पालकांची धडपड सुरू असते. पण या सगळ्याचा विचार करताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे मुलांच्या आयुष्याची सुरुवात जन्मानंतर होत नाही, तर गर्भात असतानाच त्यांच्या विकासाचा प्रवास सुरू झालेला असतो. म्हणूनच आजच्या बदलत्या जीवनशैलीत गर्भसंस्कार ही केवळ परंपरा नसून काळाची गरज बनली आहे.

नेमके भंस्कार म्हणजे काय?

गर्भसंस्कार म्हणजे गर्भवती महिलेवर कोणते तरी धार्मिक विधी करणे किंवा दिवसभर मंत्र ऐकवणे एवढाच त्याचा मर्यादित अर्थ नाही. आईचे शारीरिक आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, आहार, विचार, वर्तन, योग, प्राणायाम, संगीत, वाचन आणि कुटुंबातील वातावरण या सर्वांचा एकत्रित विचार म्हणजे गर्भसंस्कार. आई आनंदी असेल, तिच्या मनावर अनावश्यक ताण नसेल, तिला कुटुंबाचा आधार असेल आणि तिची योग्य काळजी घेतली जात असेल, तर त्याचा गर्भावस्थेतील आरोग्यावर सकारात्मक परिणाम होण्यास मदत होते.

आपल्या वेद आणि पुराणांमध्येही गर्भसंस्काराचे महत्त्व सांगितले आहे.

आपली संस्कृती आणि प्राचीन ग्रंथ यांचा अभ्यास केला तर गर्भावस्था आणि गर्भाच्या संरक्षणाला किती महत्त्व दिले गेले होते, हे लक्षात येते. अथर्ववेदाच्या शौनक संहितेतील पाचव्या काण्डातील २५ व्या सूक्तात गर्भधारणा आणि गर्भाच्या संरक्षणासाठी प्रार्थना करणारे मंत्र आहेत. त्यातील एक मंत्र असा आहे :

गर्भं धेहि सिनीवालि गर्भं धेहि सरस्वति। गर्भं ते अश्विनोभा धत्तां पुष्करस्रजा॥

(अथर्ववेद ५.२५.३)

या मंत्रातून गर्भधारणा आणि गर्भाच्या रक्षणासाठी केलेली प्रार्थना दिसून येते. त्याचप्रमाणे ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १८४ व्या सूक्तात गर्भाच्या योग्य स्थापनेसाठी प्रार्थना करणारा मंत्र आहे.

विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु। आ सिञ्चतु प्रजापतिर्धाता गर्भं दधातु ते॥

(ऋग्वेद १०.१८४.१)

या मंत्राचा भावार्थ असा की गर्भाची योग्य निर्मिती व्हावी, त्याचा विकास व्हावा आणि गर्भधारणेची प्रक्रिया निर्विघ्नपणे पूर्ण व्हावी, अशी प्रार्थना केली आहे. यावरून गर्भधारणा आणि गर्भाचे संरक्षण ही बाब आपल्या वैदिक परंपरेत किती महत्त्वाची होती, हे लक्षात येते.

प्रल्हादाची कथा – गर्भातील संस्कारांचे सुंदर उदाहरण

श्रीमद्भागवत महापुराणाच्या सप्तम स्कंधातील सातव्या अध्यायात भक्त प्रल्हादाची कथा येते. हिरण्यकश्यपू तपश्चर्येसाठी बाहेर गेलेला असताना त्याची पत्नी कयाधू गर्भवती होती. देवर्षी नारदांनी तिला आपल्या आश्रमात आश्रय दिला. त्या काळात नारद मुनींनी तिला भक्ती, धर्म आणि भगवंताच्या महत्त्वाचे ज्ञान सांगितले. प्रल्हादाने स्वतः पुढे सांगितल्याप्रमाणे, आईच्या गर्भात असतानाच त्याने नारदांचे उपदेश ऐकले होते. या कथेतून गर्भावस्थेतील वातावरण आणि चांगल्या विचारांचे महत्त्व आपल्या लक्षात येते. ही कथा केवळ भक्तीची नाही, तर गर्भावस्थेतील संस्कारांविषयी आपल्या परंपरेत असलेल्या विचारांचीही आहे.

अभिमन्यूची कथा – ऐकण्याचे महत्त्व

महाभारतातील अभिमन्यूची कथा तर सर्वश्रुत आहे. अर्जुनाने सुभद्रेला चक्रव्यूहात प्रवेश करण्याची पद्धत सांगितली आणि गर्भातील अभिमन्यूने ती ऐकली, असे प्रचलित कथन आहे. मात्र बाहेर पडण्याची पद्धत सांगण्यापूर्वी सुभद्रेला झोप लागल्यामुळे अभिमन्यूला ती माहिती मिळाली नाही, असे या कथेत सांगितले जाते. महाभारतात द्रोणपर्वात अभिमन्यूला चक्रव्यूहात प्रवेश करण्याचे ज्ञान होते, याचा उल्लेख आहे. गर्भात ऐकण्याचा हा विशिष्ट प्रसंग लोकप्रिय कथनपरंपरेत प्रसिद्ध आहे. या कथेतून गर्भावस्थेतील ऐकण्याच्या आणि वातावरणाच्या महत्त्वाकडे आपले लक्ष वेधले जाते.

अष्टावक्र ऋषींची कथा – ज्ञानाचे महत्त्व

महाभारतातील वनपर्वात अष्टावक्र आणि त्यांचे वडील कहोड यांच्याशी संबंधित प्रसंग येतो. कहोड ऋषी वेदपठण करत असताना गर्भातील अष्टावक्रांनी त्यांच्या पठणातील चुका दाखवून दिल्या, असे या कथेत वर्णन आहे. पुढे अष्टावक्र हे महान ज्ञानी ऋषी म्हणून प्रसिद्ध झाले. या कथा आपल्या प्राचीन साहित्याचा भाग आहेत. त्यांचा वैज्ञानिक पुरावा म्हणून नव्हे, तर गर्भावस्था, ज्ञान आणि संस्कार यांविषयी भारतीय परंपरेने व्यक्त केलेल्या श्रद्धा आणि विचार म्हणून विचार करणे अधिक योग्य ठरेल.

आयुर्वेदानेही गर्भिणीच्या आरोग्याला दिले विशेष महत्त्व

गर्भसंस्काराचा विचार करताना आयुर्वेदाचा उल्लेख केल्याशिवाय हा विषय पूर्ण होऊ शकत नाही. चरक संहितेतील शारीरस्थानाच्या आठव्या अध्यायात गर्भधारणा, गर्भाची वाढ आणि गर्भिणी परिचर्या याविषयी मार्गदर्शन केले आहे. सुश्रुत संहितेतील शारीरस्थानातही गर्भाची निर्मिती आणि विकास यांचा सविस्तर विचार केलेला आहे. आयुर्वेदामध्ये गर्भवती स्त्रीच्या आहार-विहाराला विशेष महत्त्व आहे. तिचे आरोग्य, आहार, विश्रांती, मानसिक स्थिती आणि दैनंदिन दिनचर्या यांचा विचार केला जातो. यालाच गर्भिणी परिचर्या असे म्हटले जाते. आजही या संकल्पनेतील अनेक मूलभूत विचार महत्त्वाचे वाटतात. कारण आईचे आरोग्य चांगले असेल तर गर्भाच्या निरोगी वाढीसाठी पोषक परिस्थिती निर्माण होण्यास मदत होते.

गर्भसंस्कार आणि योग – आईसाठीही, बाळासाठीही महत्त्वाचे

गर्भावस्थेत योग्य मार्गदर्शनाखाली केलेला सौम्य योग, श्वसनाचे योग्य प्रकार, ध्यान आणि विश्रांती यामुळे गर्भवती महिलेला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्यास मदत होऊ शकते. मात्र गर्भावस्थेतील प्रत्येक महिलेची प्रकृती, गर्भावस्थेचा टप्पा आणि वैद्यकीय परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे योगासने, प्राणायाम किंवा इतर कोणताही सराव करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला आणि प्रशिक्षित मार्गदर्शन आवश्यक आहे. सर्व योगप्रकार प्रत्येक गर्भवती महिलेसाठी योग्य असतातच असे नाही.

गर्भसंस्कार ही केवळ आईची जबाबदारी नाही!

अनेकदा गर्भसंस्कार म्हटले की सर्व जबाबदारी आईवरच टाकली जाते. प्रत्यक्षात तसे नाही. आईला आनंदी ठेवणे, तिच्या भावना समजून घेणे, तिच्या आहाराची व विश्रांतीची काळजी घेणे आणि तिला मानसिक आधार देणे ही संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. घरात सतत भांडणे, ताणतणाव आणि नकारात्मक वातावरण असेल, तर केवळ गर्भसंस्काराचे वर्ग लावून अपेक्षित बदल घडणार नाही. त्यासाठी कुटुंबातील प्रत्येकाने थोडे बदलणे गरजेचे आहे. आईला आवडणारे संगीत, चांगले पुस्तक, निसर्गात थोडा वेळ, कुटुंबीयांशी मनमोकळा संवाद, पुरेशी झोप आणि संतुलित आहार या साध्या गोष्टीदेखील तिच्या आनंदात भर घालू शकतात. गर्भसंस्कार म्हणजे महागडे वर्ग किंवा मोठे विधी नव्हेत. योग्य माहिती, योग्य आहार, सकारात्मक विचार, सुरक्षित योगाभ्यास आणि प्रेमळ कौटुंबिक वातावरण यांचा सुंदर संगम म्हणजे गर्भसंस्कार. अर्थात, गर्भसंस्कार हा नियमित प्रसूतीपूर्व वैद्यकीय तपासणी, डॉक्टरांचा सल्ला, आवश्यक उपचार आणि पोषण यांचा पर्याय नाही. श्रद्धा आणि विज्ञान यांची योग्य सांगड घालणे हेच आजच्या काळातील खरे शहाणपण आहे.

शेवटी एवढेच...

आपण एखादे रोपटे लावतो तेव्हा त्याला चांगली माती, पाणी आणि सूर्यप्रकाश देतो. कारण त्याची वाढ योग्य व्हावी, ही आपली अपेक्षा असते. मग उद्याच्या पिढीचा पाया असलेल्या गर्भाची काळजी घेताना आपण किती जागरूक असायला हवे? मुलांना मोठे झाल्यावर चांगले संस्कार देण्यापेक्षा त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीपासूनच प्रेम, सकारात्मकता आणि निरोगी वातावरण देण्याचा प्रयत्न करूया. कारण प्रत्येक मूल हे केवळ एका कुटुंबाचे भविष्य नसते, तर ते उद्याच्या समाजाचा एक महत्त्वाचा भाग असते.

"निरोगी आई, आनंदी गर्भावस्था आणि प्रेमळ कौटुंबिक वातावरण... हीच सुदृढ व सुसंस्कृत पिढी घडवण्याची पहिली पायरी आहे."

गर्भसंस्कार ही एका बाळाच्या जन्माची तयारी नाही, तर एका सुंदर भविष्याची सुरुवात आहे!

वैद्य :- मुक्ता ढवळे
"आयुर्वेदतज्ज्ञा रोगप्रशिक्षिका"
(बीएएमएस,डी,डीएनवायएस)
८९७५३६०४८४



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संमिश्र वार्ता

जामा मस्जिद पोलीस ठाण्यात आरोपीचा चाकूने हल्ला



नवी दिल्ली : प्रतिनिधी

दिल्लीतील जामा मस्जिद पोलीस ठाण्यामध्ये आज एक धक्कादायक प्रकार घडला आहे. एका तरुणाने थेट पोलिसांवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात पाच पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. जखमी झालेल्या पाचपैकी तीन पोलिसांची प्रकृती गंभीर असून, त्यांना तातडीने गंगाराम रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. तर, इतर दोन जखमी पोलिसांवर संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपीवर गोळी चालवून त्याला ताब्यात घेतले आहे.आई आणि बहिणीला त्रास दिल्याच्या तक्रारीवरून बोलावले होते ठाण्यातया संपूर्ण घटनेमागे घरगुती किंवा कौटुंबिक वाद असल्याचे समोर आले आहे. हा तरुण आपल्या आईला आणि बहिणीला त्रास देत असल्याची तक्रार पोलिसांकडे आली होती. या तक्रारीची दखल घेऊन पोलिसांनी पुढील कारवाईसाठी त्याला जामा मस्जिद पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलावले होते. पोलीस ठाण्यात त्याची चौकशी सुरू असतानाच त्याने अचानक भडकून पोलिसांवर चाकूने हल्ला केला. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांनी गोळीबार करत आरोपीला पकडले. सध्या जखमी पोलिसांवर रुग्णालयांमध्ये उपचार सुरू असून, या प्रकरणाची पुढील माहिती आणि तपास पुढे येत आहे.

सायबर गुन्हेगारांकडून खात्याचा गैरवापर होण्याचा धोका



वापरणाऱ्या युजर्ससाठी महत्त्वाची सूचना समोर आली आहे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या (I4C) राष्ट्रीय सायबर गुन्हे धोका विश्लेषण युनिटने (NCTAU) WhatsApp Web सेशनच्या गैरवापराबाबत सावध केले आहे. वापरकर्त्यांनी एकदा संगणकावर WhatsApp Web लॉग इन केल्यानंतर योग्य पद्धतीने लॉग आउट केले नाही, तर त्यांच्या खात्याचा अनधिकृत वापर होऊ शकतो. त्यामुळे खासगी संदेश, संपर्क आणि ग्रुपमधील संभाषणांचा गैरवापर होण्याची शक्यता आहे.WhatsApp Web सेशनचा गैरवापर कसा होऊ शकतो?गृह मंत्रालयाच्या I4C ने जारी केलेल्या सूचनेनुसार, आधीपासून लॉग इन असलेल्या WhatsApp Web सेशनचा गैरवापर करून सायबर गुन्हेगार खात्यात प्रवेश मिळवू शकतात. अशा वेळी ते वापरकर्त्यांचे संदेश वाचू शकतात, त्यांच्या नावाने इतरांना मेसेज पाठवू शकतात आणि फसवणूक किंवा फिशिंगसारखे सायबर गुन्हे करू शकतात. विशेषतः कार्यालयातील संगणक, सार्वजनिक संगणक किंवा इतरांसोबत वापरल्या जाणाऱ्या उपकरणांवर WhatsApp Web वापरताना अधिक काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.WhatsApp Web वापरताना कोणती काळजी घ्यावी?I4C ने वापरकर्त्यांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.प्रत्येक वेळी लॉग आउट करा: काम झाल्यानंतर WhatsApp Web मधून स्वतः लॉग आउट करा. केवळ ब्राउझरची विंडो किंवा टॅब बंद केल्याने लॉग आउट होत नाही.सार्वजनिक संगणक टाळा: सायबर कॅफे, हॉटेलमधील संगणक किंवा अनोळखी उपकरणांवर WhatsApp Web वापरू नका. संवेदनशील माहिती पाठवू नका: शासकीय, आर्थिक, संस्थात्मक किंवा गोपनीय माहितीची देवाणघेवाण WhatsApp Web वरून टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.इनकॉग्निटो मोड वापरा: तात्पुरत्या वापरासाठी विश्वसनीय संगणकावर प्रायव्हेट किंवा इनॉग्निटो ब्राउझिंग मोडचा वापर करा. तरीही काम झाल्यावर मॅन्युअली लॉग आउट करणे आवश्यक आहे.अनोळखी फाइल्स डाउनलोड करू नका: संशयास्पद लिंक, अज्ञात फाइल्स आणि क्रॅक केलेले सॉफ्टवेअर टाळा.

असामान्य हालचाली तपासा: आपल्या खात्यातून अनपेक्षित संदेश पाठवले जात असतील किंवा संपर्कांकडून विचित्र प्रतिसाद मिळत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. मोबाईल आणि ब्राउझर अपडेट ठेवा।4C ने मोबाईल, संगणक, ऑपरेटिंग सिस्टिम आणि ब्राउझर नेहमी अपडेट ठेवण्याचा सल्ला दिला आहे. तसेच सुरक्षा सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवणेही महत्त्वाचे आहे.WhatsApp Web वापरताना थोडीशी निष्काळजीपणाही खात्याच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे विशेषतः ऑफिस किंवा सामायिक संगणकावर काम करताना लॉग इन आणि लॉग आउट करण्याच्या प्रक्रियेकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

पश्चिम बंगालमधील बेरोजगार तरुणांना दरमहा 2,000 रुपयांपर्यंत भत्ता

पश्चिम बंगाल : प्रतिनिधी



पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील बेरोजगार तरुणांसाठी आर्थिक मदतीची घोषणा केली आहे. 'भोरशा कर्मसूची' या योजनेअंतर्गत पात्र बेरोजगार तरुणांना दरमहा आर्थिक भत्ता दिला जाणार आहे. जानेवारीपासून या योजनेची अंमलबजावणी सुरू होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी दिली. पात्रतेनुसार लाभार्थ्यांना दरमहा 1,500 ते 2,000 रुपये मिळणार आहेत.कोणाला किती भत्ता मिळणार?मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पदवी नसलेल्या बेरोजगार तरुणांना दरमहा 1,500 रुपये, तर पदवीधर आणि सरकारी व्यावसायिक संस्था तसेच आयटीआयमधून डिप्लोमा मिळवलेल्या पात्र तरुणांना दरमहा 2,000 रुपये भत्ता दिला जाईल.भाजपच्या जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार, 2028-29 या आर्थिक वर्षापासून या भत्त्याच्या रकमेत वाढ करण्यात येणार आहे. त्यानुसार, सध्या 1,500 रुपये मिळणारा भत्ता 2,000 रुपये, तर 2,000 रुपये मिळणारा भत्ता 3,000 रुपये केला जाईल.या योजनेसाठी अर्जदारांचे वय 21 ते 45 वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. मागील तृणमूल काँग्रेस सरकारच्या 'युवसथी' योजनेच्या जागी ही नवी योजना लागू करण्यात येत आहे.54 लाख लाभार्थ्यांची पडताळणी सुरूमंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सांगितले की, मागील सरकारच्या योजनेतील सुमारे 54 लाख विद्यमान लाभार्थ्यांची पूर्ण केली जाईल. योजनेसाठी अद्याप अर्ज न केलेल्या पात्र तरुणांना 'आपनार सरकार आपनार पाशे' या कार्यक्रमाच्या माध्यमातून अर्ज करता येणार आहे. हे अर्ज युवा कल्याण विभागाकडे पाठवले जातील. प्रत्येक कुटुंबातील दोन व्यक्तींनाच लाभया योजनेचा भत्ता दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केला जाणार आहे. फेब्रुवारी महिन्यात विशेष कार्यक्रमाद्वारे योजनेचे औपचारिक उद्घाटन करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन व्यक्तींनाच या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच अन्नपूर्णा योजनेअंतर्गत दरमहा 3,000 रुपयांचा भत्ता मिळणाऱ्या व्यक्तींना या योजनेसाठी पात्र ठरवले जाणार नाही.बेरोजगार तरुणांना आर्थिक आधार देणे आणि त्यांना रोजगाराच्या संधी मिळेपर्यंत मदत करणे, हा या योजनेचा उद्देश असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे.

जाधववाडीतील बालाजी मठाच्या जमिनीवर कथित अवैध प्लॉटिंग; एसआयटी चौकशीची मागणी

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

जाधववाडी येथील श्रीराम मंदिर संस्थान बालाजी मठाच्या मालकीच्या वर्ग-२ जमिनीवर परवानगीशिवाय प्लॉट पाडून विक्रीचे व्यवहार सुरू असल्याचा प्रकार समोर आल्याचे वृत्त आहे.

गट क्रमांक १२४ आणि १२५ मधील जमीन हस्तांतरणास प्रतिबंधित असतानाही प्लॉटिंग सुरू असल्याची माहिती महापालिकेला मिळाली.

अतिक्रमण विभागाच्या पथकाने पाहणी केली असता महसूल विभाग किंवा महापालिकेची अधिकृत मंजुरी नसताना रस्ते व इतर सुविधा उभारल्याचे निदर्शनास आले. मंजुरी नसलेल्या रस्ते व सुविधांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नागरिकांची संभाव्य आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी संबंधित विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा पाठपुरावा सुरू असून, प्रकरणाची व्याप्ती तपासण्यासाठी विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याची मागणी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

व्यवहार करताना नागरिकांनी सातबारा, जमिनीचा वर्ग, हस्तांतरणाची परवानगी आणि मंजूर लेआउटची कागदपत्रे तपासावीत.

गवळी, गोल्लार, वडार आणि चर्मकार समाजाच्या प्रश्नांवर शासन सकारात्मक; हिवाळी अधिवेशनात मार्ग काढणार

मुंबई: प्रतिनिधी



विधान भवन येथे सोमवारी राज्यातील विविध समाजांचे प्रश्न आणि प्रलंबित मागण्या जाणून घेण्यासाठी विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत अनेक प्रलंबित विषयांवर चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत गवळी, गोल्लार, वडार, रोहिदास (चर्मकार) आणि हिंदू ढोर-कक्कया समाजाच्या शिष्टमंडळांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. तसेच त्या मागण्या सकारात्मक पद्धतीने नागपूर हिवाळी अधिवेशनात मांडण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.या सर्व मागण्यांवर आगामी नागपूर हिवाळी अधिवेशन कालावधीत सकारात्मक चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन उपसभापती सचिन अहिर यांनी यावेळी दिले. मेळघाटसारख्या दुर्गम भागातील गवळी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारणे व शासकीय सुविधा पुरवणे. तसेच, 'श्री कृष्ण आर्थिक विकास महामंडळा'च्या व्याप्तीमध्ये महाराष्ट्रातील गवळी समाजाच्या सर्व उपशाखा आणि तत्सम जातींचा (उदा. यादव, अहिर गवळी, नंद गवळी, मराठी गवळी, गोल्ला, गोल्लेवार, गोल्लेरु, गोलकर, दाभोली गवळी, तमिळ व तेलंग यादव, तसेच मुंबई-ठाणे व राज्यातील हिंदी भाषिक उत्तर भारतीय ग्वाल, अहीर, यादव) समावेश करणे.समाजप्रबोधन आणि समतेचा संदेश देणारे संत शिरोमणी वीरशैव कक्कय्या महाराज यांना केंद्र व राज्य शासनाने 'राष्ट्रीय संत' म्हणून घोषित करावे व त्यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी करावी. तसेच, या समाजाला सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, यांसारख्या मागण्या या बैठकीत मांडण्यात आल्या. तसेच गोल्लार, वडार आणि रोहिदास (चर्मकार) समाजाच्या प्रतिनिधींनीही आपापल्या समाजाच्या विकासासाठी आणि प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी या बैठकीत सविस्तर मुद्दे मांडले. या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी व विविध समाजांचे प्रमुख प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदूर-मधमेश्वर कालव्याचे रब्बी आवर्तन सुरू; १०२ गावांतील पिकांना दिलासा



वैजापूर : प्रतिनिधी

खरीप हंगामातील नुकसानीने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांसाठी नांदूर-मधमेश्वर कालव्यातून रब्बी हंगामाचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे. २० नोव्हेंबरच्या रात्री सुरुवातीला ३०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले. या आवर्तनातून सुमारे दीड टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून वैजापूर, गंगापूर आणि कोपरगाव तालुक्यांतील १०२ गावांमधील सुमारे ४३ हजार ५६० हेक्टर क्षेत्राला लाभ अपेक्षित आहे. कालव्यावरील ४९ पोटचाऱ्यांद्वारे पाणीवाटपाचे नियोजन असून आवर्तन सुमारे तीन आठवडे सुरू राहणार आहे. विसर्ग टप्प्याटप्प्याने ८५० क्युसेकपर्यंत वाढवण्याचे नियोजन आहे. पाणीवाटप 'टेल टू हेड' पद्धतीने होणार असून अनधिकृत उपसा व वाद टाळण्यासाठी बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. याच जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात परिस्थिती वेगळी आहे. तालुक्यातील २१ धरणांतील पाणीसाठा घटत असून काही नद्या व पाझर तलाव कोरडे पडल्याचे वृत्त आहे. सध्या टँकरची मागणी नसली तरी आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता प्रशासनाने लक्षात घेतली आहे. ग्रामसेवकांना संभाव्य टंचाईसाठी उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

ग्रामस्थांशी संवाद साधत पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले जलसंधारण चळवळीला बळ


सिंधुदुर्ग : प्रतिनिधी



दुष्काळी परिस्थितीचा सामना करताना पाण्याचा प्रत्येक थेंब अडविणे, जमिनीत जिरविणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. अशा परिस्थितीत लोकसहभागातून उभ्या राहणाऱ्या जलसंधारणाच्या कामांना बळ देण्यासाठी राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दोडामार्ग तालुक्यातील झरेबांबर-आंबेली येथे वनराई बंधाऱ्याच्या उभारणीत प्रत्यक्ष श्रमदान केले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्यासह अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनीही श्रमदानात सहभाग घेतला. याचवेळी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'घर तिथे शोषखड्डा' अभियानांतर्गत शोषखड्ड्याच्या कामाचा प्रारंभही पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आला.दुष्काळाच्या संभाव्य संकटावर मात करण्यासाठी केवळ प्रशासकीय उपाययोजना बरोबर लोकसहभागातून जलसंधारणाची व्यापक चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. या भूमिकेतून झरेबांबर-आंबेली येथील ग्रामस्थांनी एकत्र येत वनराई बंधारा उभारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात पालकमंत्र्यांनी स्वतः सहभागी होत श्रमदान केले. जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधीही ग्रामस्थांसोबत कामात सहभागी झाल्याने लोकसहभागातून जलसंधारण करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन मिळाले. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

जिल्ह्यात सुरू असलेल्या 'घर तिथे शोषखड्डा' अभियानालाही यावेळी चालना देण्यात आली. पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते शोषखड्ड्याच्या कामाचा प्रारंभ करण्यात आला. घरगुती वापरानंतर निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे, पाण्याचे जमिनीत पुनर्भरण होण्यास मदत करणे आणि परिसरातील स्वच्छता व पर्यावरणाचे संवर्धन करणे या दृष्टीने शोषखड्डे महत्त्वाचे ठरतात. वनराई बंधारे आणि शोषखड्डे अशा विविध उपाययोजनांची सांगड घालून पाण्याचे संवर्धन करण्यावर या अभियानातून भर दिला जात आहे. स्थानिक परिस्थितीला अनुरूप आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य कामे लोकसहभागातून उभी राहिल्यास त्यांचे दीर्घकालीन परिणाम साधता येऊ शकतात.या वेळी पालकमंत्री नितेश राणे यांनी वनराई बंधाऱ्याच्या उभारणीसाठी पुढाकार घेणाऱ्या महिला बचत गटांच्या सदस्यांचे आणि ग्रामस्थांचे आभार मानले. दुष्काळी परिस्थितीत ग्रामस्थांनी दाखविलेली एकजूट, श्रमदानाची तयारी आणि पाणी वाचविण्यासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. संकटाच्या काळात प्रशासन ग्रामस्थांच्या पाठीशी असून, अशा लोकाभिमुख उपक्रमांमधून ग्रामीण भागाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या दौऱ्याला ग्रामस्थांशी साधलेल्या अनौपचारिक संवादाचीही विशेष किनार लाभली. वनराई बंधाऱ्याच्या कामानंतर पालकमंत्री नितेश राणे यांनी गावातील ग्रामस्थांसोबत शेतात बसून भाजी आणि नाचणीची भाकरी खाल्ली. शेतातील बांधावर नाचणीची भाकरी खाताना ग्रामस्थांशी गप्पा रंगल्या. ग्रामीण जीवनातील साधेपणा अनुभवत पालकमंत्र्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांच्यातील सुसंवादातून विकासकामांना अधिक लोकाभिमुख दिशा मिळू शकते, याचे चित्र या प्रसंगातून पाहायला मिळाले.या वेळी सभापती पर्वती गवस, जिल्हा परिषद सदस्य साक्षी तळवडेकर, रामा गवस, श्रेया धरणे, पंचायत समिती सदस्य स्नेहा गवस, सायली निंबाळकर, नगराध्यक्ष चेतन चव्हाण, गटविकास अधिकारी अजिंक्य सावंत, सरपंच अनिल शेटकर, उपसरपंच शाम नाईक, ग्रामविकास अधिकारी कृष्णा देसाई, पोलीस पाटील चंद्रशेखर सावंत, गावचे मानकरी केशव गवस यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी, महिला बचत गटांच्या सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

Maze for kids



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

हैदराबादमध्ये 2 बॉम्बस्फोटांची धमकी; 300 जणांना ठार मारण्याचा इशारा, पोलीस सतर्क

लष्कर-ए-तोयबा (LeT) या दहशतवादी संघटनेच्या नावाने कथितरित्या देण्यात आलेल्या धमकीनंतर हैदराबाद पोलिसांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शहरात दोन बॉम्बस्फोट घडवून किमान 300 जणांना ठार मारण्याचा कट असल्याची धमकी एका पत्रातून देण्यात आल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेतलतीफ भटच्या मृत्यूचा बदला घेण्याची धमकीहैदराबादमधील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात या धमकीचा उल्लेख करण्यात आला आहे. हैदराबाद शहर पोलीस सहआयुक्त (विशेष शाखा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, पत्र पाठवणाऱ्याने 18 नोव्हेंबर रोजी जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील झांगलपोरा येथे झालेल्या चकमकीचा संदर्भ दिला आहे.या चकमकीत दक्षिण काश्मीरमधील लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी लतीफ भट ठार झाला होता. त्याच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी 26 नोव्हेंबर रोजी हैदराबादमध्ये मुंबईतील 26/11 दहशतवादी हल्ल्यासारखी घटना घडवण्याची धमकी पत्रात देण्यात आल्याचे



पोलिसांनी म्हटले आहे.हॉटेल, रेल्वे स्थानकांसह गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवलीया धमकीनंतर काचीगुडा येथील हॉटेल टुरिस्ट प्लाझा आणि काचीगुडा रेल्वे स्थानकासह शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.हॉटेल्स, रेल्वे आणि बस स्थानके, धार्मिक स्थळे तसेच गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणी विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संशयास्पद व्यक्ती, बेवारस वस्तू, वाहने आणि असामान्य हालचालींवर नजर ठेवण्यास सांगण्यात आले आहे. तसेच गस्त वाढवणे, घातपातविरोधी तपासणी करणे आणि संबंधित सुरक्षा यंत्रणांमध्ये समन्वय राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.दरम्यान, धमकीच्या पत्राची सत्यता आणि त्यामागील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांकडून जारी होणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

अस्वच्छतेचा ठपका ! नाशिक शहरातील चार हॉटेलचे परवाने निलंबित

नाशिक : प्रतिनिधी

अन्न सुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन, नाशिक विभागाने शहरातील चार हॉटेलचे परवाने आणि एका कॅफेचे नोंदणी प्रमाणपत्र तात्काळ निलंबित केले आहे.

२० नोव्हेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, सह आयुक्त मंगेश माने, सहायक आयुक्त (अन्न) विनोद धवड आणि ज्ञानेश्वर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.तपासणीदरम्यान अस्वच्छता, अन्नपदार्थांची अयोग्य साठवणूक, मुदतबाह्य पदार्थ, कच्च्या मालाची अस्वच्छ साठवणूक, स्वयंपाकघराच्या रचनेतील त्रुटी, उंदरांची विष्ठा तसेच कीटकांचा प्रादुर्भाव आढळून आला.

काही ठिकाणी अन्न सुरक्षा व



मानके नियम, २०११ मधील अनुसूची चारचे उल्लंघन झाले होते. कॅफे दुर्ग येथे ग्राहकांच्या बिलावर एफएसएसएआय परवाना क्रमांक नसणे आणि स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या माध्यमाचा उल्लेख मेन्यू कार्डवर नसणे,

या त्रुटीही आढळल्या.ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी अश्विनी पाटील, ऋतुजा नवले, प्रतीक भंड, किशोर चांदगुडे आणि संकेत येलमामे यांनी केली.

नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन अशा आस्थापनांची तपासणी व नियमानुसार कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ आणि त्याअंतर्गत नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे

. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत किंवा सुरक्षिततेबाबत संशय असल्यास नागरिकांनी या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असेही प्रशासनाने कळविले आहे.

येवला रेल्वे स्थानकावर 12.56 कोटींचा बंदिस्त मालधक्का व खत रॅक पॉईंट मंजूर

नाशिक :प्रतिनिधी

राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून येवला-लासलगाव मतदारसंघासह नाशिक जिल्ह्यातील शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधेसाठी येवला रेल्वे स्थानकावर बंदिस्त मालधक्का (Covered Goods Shed) व खत रॅक पॉईंट (Fertilizer Rake Point ID 1451) उभारण्याच्या मान्यता मिळाली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी १२.५६ कोटी रुपयांचा निधी मंजूरकेला असून कामाची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. सन २०२७-२८ या आर्थिक वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट रेल्वे प्रशासनाने निश्चित केले आहे.या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी मंत्री छगन भुजबळ यांनी १७ मार्च २०२५ रोजी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मनमाड रेल्वे स्थानकावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तसेच येवला परिसरातील खत पुरवठा सुरळीत राहण्यासाठी हा प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी २० सप्टेंबर २०२६ रोजी मध्य रेल्वेच्या



महाप्रबंधकांकडे केली होती. या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत मध्य रेल्वे महाप्रबंधक कार्यालयाने २९ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिकृत पत्राद्वारे प्रकल्पास मंजुरी दिली आहे.येवला रेल्वे स्थानकावर ३५० मीटर लांबी व १५ मीटर रुंदीचे काँक्रीटीकरणासह बंदिस्त शेड, ६०० मीटर लांबीची गटार व्यवस्था, ९०० मीटर संरक्षक भिंत, पिण्याच्या पाण्याची सुविधा, ४५ हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी तसेच हायमास्ट व पथदिव्यांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे येवला व नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आपला कृषी माल देशांतर्गत बाजारपेठेत तसेच निर्यातीसाठी पाठविण्याची अधिक सक्षम सुविधा उपलब्ध होणार आहे. बंदिस्त मालधक्क्यामुळे माल हाताळणी व साठवणुकीदरम्यान होणारे नुकसान कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर खत रॅक पॉईंट कार्यान्वित झाल्यामुळे खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना रासायनिक खते वेळेत उपलब्ध होऊन खत पुरवठा साखळी अधिक मजबूत होणार आहे.आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या काळात मनमाड रेल्वे स्थानकावरील मालवाहतुकीचा ताण कमी करण्यासाठीही येवला येथील मालधक्का महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे रेल्वे वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी होऊन कृषी आणि व्यापार क्षेत्राला मोठी चालना मिळेल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी निधी मंजूर करून आवश्यक कार्यवाही सुरू केल्याबद्दल केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्र सरकारचे मंत्री छगन भुजबळ यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. येवला परिसराच्या कृषी, व्यापार व आर्थिक विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

उल्हासनगरचा विकास आराखडा तयार होणार! सिंधी बांधवांना जमिनीचे पट्टे देण्याची प्रक्रिया लवकरच

ठाणे: प्रतिनिधी

उल्हासनगर येथे हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट बोर्डच्या चंदीबाई हिंमतमल मनसुखानी (सीएचएम) महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी बोलताना केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून त्या पदवीसोबत उपयोजित ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करणे आजच्या काळाची गरज आहे. बदलत्या रोजगार बाजारपेठेच्या आणि अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार युवकांचे कौशल्य विकसित केल्यास भारत केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर संपूर्ण जगासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देऊ शकतो. त्यामुळे कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्याचे कार्य शैक्षणिक संस्थांनी करावे, असे प्रतिपादन मुख्यत, जिद्द आणि उद्यमशीलतेच्या जोरावर पुन्हा उभारी घेतली. आज देशातील उद्योग, वैद्यकीय, अभियांत्रिकी, सनदी लेखा आणि विविध व्यावसायिक या सारख्या विविध क्षेत्रांमध्ये सिंधी समाजाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच फाळणीनंतर समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी आणि त्यांच्या आयुष्याला दिशा मिळावी, या उद्देशाने 1949 मध्ये वांद्रे येथे नॅशनल कॉलेजची स्थापना करण्यात आली. या शैक्षणिक उपक्रमाचा पुढे विस्तार होत एचएसएनसीच्या माध्यमातून आज विविध प्रकारच्या 27 संस्था कार्यरत आहेत. मुंबई विद्यापीठातील सर्वांत मोठे महाविद्यालयही या संस्थेमार्फत चालविले जात असून सुमारे १४ हजार विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत, ही अभिमानाची बाब




असल्याचे फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.पुढे बोलताना, शिक्षण क्षेत्राकडे केवळ व्यवसाय किंवा पैसा कमावण्याचे साधन म्हणून न पाहता समाजनिर्मितीची व्यवस्था म्हणून पाहण्याची संस्थेची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नांमुळे संस्थेचे माजी विद्यार्थी देश-विदेशात विविध क्षेत्रांत यशस्वी झाले आहेत. वर कुशल मनुष्यबळ पुरविण्याची मोठी संधी आहे. आजच्या अर्थव्यवस्थेच्या गरजांनुसार मानवी संसाधन विकसित करण्यासाठी कौशल्य विकास महत्त्वाचा आहे. या दृष्टीने सीएचएम संस्थेने सुरू केलेला उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उल्हासनगर शहराच्या विकासाबाबत बोलताना, मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उल्हासनगरचा समावेश मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाच्या व्यापक संकल्पनेत करण्यात आला आहे. शहरात मेट्रोची सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू असून मेट्रोमुळे शहराची कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. याशिवाय काँक्रीट रस्ते, उड्डाणपूल आणि स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची योजना यांसारख्या कामांना मान्यता देण्यात आली असून ही कामे सुरू होत आहेत. उल्हासनगर शहराला पुन्हा नियोजनबद्ध शहराचे स्वरूप देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. अनधिकृत ठरलेल्या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांना अधिकृत करण्यासह क्लस्टर विकासाच्या माध्यमातून शहराचा नियोजनबद्ध व्यापक आराखडा तयार करण्यात येईल, असेही त्यांनी यावली सांगितले.धी बांधवांना जमिनीचे मालकी हक्क देणारयामध्ये आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे, उल्हासनगरमध्ये स्थायिक झालेल्या सिंधी समाजातील बांधवांना त्यांच्या जमिनीचे मालकी हक्काचे पट्टे देणे आणि जमिनी फ्रीहोल्ड करणे याबाबत शासनाने निर्णय घेतल्याचे सांगत या प्रक्रियेची सुरुवात नागपूरपासून करण्यात आली असून लवकरच उल्हासनगरमध्येही ही प्रक्रिया राबविण्यात येईल, अशी ग्वाही ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

आजचे मराठी शब्दकोडे

तुमच्या बुद्धीला चालना देणारे खास कोडे

पांढऱ्या चौकटीत अधरे भरा ☐ काळ्या चौकटी रिकाम्या ठेवा



आडवे प्रश्न (20)

1. भारताची राजधानी
2. महाराष्ट्राची राजधानी
3. ज्ञानाचा राजा
4. राष्ट्रीय पक्षी
5. पाण्याचा समानार्थी शब्द
6. फुलांचा राजा
7. देशाचा राष्ट्रीय प्राणी
8. सूर्याची पहिली किरण
9. शेतकऱ्याचा मित्र
10. घराचा आधार
11. भारताचा राष्ट्रीय खेळ
12. समुद्रातील मोठा जीव
13. गोड फळ
14. बागेतील फूल
15. मुलांचा आवडता खेळ
16. अभ्यासाचे ठिकाण
17. देशाचा तिरंगा रंग
18. स्वातंत्र्य दिनाची तारीख
19. पावसाळ्यातील महिना
20. आपल्या भाषेचा अभिमान

उभे प्रश्न (20)

1. राज्याचे राज्यपाल
2. भारताचे पंतप्रधान
3. देशाची संसद
4. भारतीय चलन
5. शाळेची घंटा
6. मित्राचा समानार्थी शब्द
7. शत्रूचा विरोधी शब्द
8. रात्रीचा प्रकाश
9. झाडाचा मित्र
10. गावातील देवस्थान
11. पुस्तकाचा मित्र
12. नदीचा उगम
13. डोंगराची शिखर
14. चिमणींचे घर
15. आईचा समानार्थी शब्द
16. वडिलांचा समानार्थी शब्द
17. खेळातील विजय
18. मेहनतीचा पर्याय
19. शांतीचा प्रतीक
20. आनंदाचा स्रोत

टीप : हा शब्दकोडे छान सोडवा आणि आपल्या बुद्धीची कसोटी पहा !

आजच्या चार मराठी म्हणी

१. अति तिथे माती
अर्थ : कोणत्याही गोष्टीचा अतिरेक केला तर नुकसान होते.

२. थेंबे थेंबे तळे साचे
अर्थ : थोडीथोडी बचत किंवा मेहनत केली तर मोठें यश मिळते.

३. जशी करणी तशी भरणी
अर्थ : माणसाला आपल्या कर्मानुसार फळ मिळते.

४. नाचता येईना अंगण वाकडे
अर्थ : स्वत:ची कमतरता मान्य न करता दुसऱ्यांना दोष देणे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

काशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-1 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.**: MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**